माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ५०१/२०२२**

**अपिलार्थी, कु. योगिता ताराचंद ठवरे (कामाठी)**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी, ता. देवरी जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त,**
आदिवासी विकास विभाग कार्यालय, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०४.२०२४**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०७.२०२१ | १२.०८.२०२१ | २९.११.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २६.०७.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दि. १७.०६.२०२१ रोजी गैरअर्जदाराविरुध्द अर्जदाराने केलेल्या तक्रार अर्जासंबंधीत प्रकल्प कार्यालय देवरी येथील अधिकाऱ्यांनी गैरअर्जदारांवर केलेल्या कारवाईची सत्यप्रत, बयान व अहवालाची सत्यप्रत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपणास कोणती माहिती पाहिजे याचा अर्थबोध होत नाही. तरी आपणांस हवी असलेल्या माहितीची मुद्देनिहाय मागणी करावी जेणेकरुन माहिती पुरविणे सोईचे होईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २९.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "दि. १७.०६.२०२१ च्या तक्रारीसंबंधी कोणतीच माहिती न मिळाल्याबाबत" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २१.०२.२०२२ रोजी** " दि. १७.०६.२०२१ च्या तक्रार संबंधित कोणतीच माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्रीमती ठवरे यांनी दिनांक २६.०७.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्जात कोणती माहिती पाहिजे याचा अर्थबोध होत नाही. तरी हवी असलेल्या माहितीची मुद्देनिहाय मागणी करावी जेणेकरुन माहिती पुरविणे सोईचे होईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. सदर प्रकरणी दाखल केलेल्या जोडपत्र-अ व ब तसेच दि. २१.०२.२०२२ रोजी आयोगास केलेल्या विनंती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी हया जेथे कार्यरत होत्या त्या अनु. आदिवासी आश्रम शाळेसंबंधित वरील अर्ज असून अपिलार्थी यांनी प्रज्ञा शिक्षण संस्था येरंडी/नवेगावबांध या संस्थेचे संस्था चालक तसेच सदर संस्थेव्दारा संचालित शाखा श्रीमती मालिनीताई एस. दहिवले अनुदानित आदिवासी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा येरंडी/बाराभाटी येथील मुख्याध्यापक, अधिक्षक व स्त्री अधिक्षीका यांचेविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप केलेले आढळून येते.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलित करुन दिनांक १६.११.२०२१ रोजी अर्जदार योगीता ताराचंद ठवरे हया दारिद्रय रेषेखाली नसल्यामुळे सदर माहितीचे झेरॉक्सचा व टपाल खर्च या कार्यालयाचे रोखशाखा यांचेकडे भरुन उपलब्ध माहिती कार्यालयीन वेळेत येवून घेवून जाण्याबाबत अपिलार्थीस सुचीत केले आहे. त्यानंतर पुनश्च: एकदा दिनांक ०१.१२.२०२१ रोजी अपिलार्थीस सशुल्क माहिती घेवून जाण्याबाबत सुचीत केले होते. त्यानंतर दिनांक २९.१२.२०२१ रोजी संबंधित अर्जदार हे माहिती नेण्यास येत नसून आपणास पत्र पाठवित असतात. वरील सर्व पत्रव्यवहार करुन अर्जदार माहिती नेण्यास इच्छुक दिसत नाही करीता माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त सदर पत्र हे मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांना पाठविण्यात आले आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर अपिलार्थी यांना सुयोग्य प्रतिसाद देण्यात आलेला असून अपिलार्थी यांनी



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

संस्थाचालकाविषयी केलेली तक्रार इत्यादीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल अपील अर्जात संबंध नसून कर्मचारी व त्यांची नियुक्ती करणारे प्राधिकरण यात असलेला मतभेद व एकमेंकावर केलेले आरोप हे माहिती अधिकार कायद्याच्या कार्यकक्षेच्या बाहेरची बाब आहे.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन देण्यात आलेला प्रतिसाद तसेच दिनांक २९.१२.२०२१ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना वरील माहिती प्राप्त करुन घेण्यास स्वारस्य नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता, वरील व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०४.२०२४**

जावक क्रमांक ६४४४ दिनांक 29 AUG 2024